कष्टाचे व्हावे चांदणे यशाचा चंद्र दिसावा
तुमच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण प्रगतीचा इंद्रधनुष्य

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १५७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१८ जानेवारी २०२५

## खळबळजनक ! अल्पवयीन मुलीचे अपहरण करून बलात्कार




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, बुलडाणा :** अल्पवयीन मागासवर्गीय विद्यार्थिनीस बळजबरीने दुचाकीवर बसवून गावाबाहेरील एका लॉज वर नेत शारीरिक अत्याचार केल्याची खळबळजनक घटना मेहकर परिसरात घडली आहे. यामुळे सम ाजमन हादरले आहे.

पीडिता शाळेत जात असताना आरोपी नेहमीच तिचा पाठलाग व बोलण्याचा प्रयत्न करीत होता. त्याची बालिकेवर वाईट नजर होती. घटना प्रसंगी त्याने त्याच्या मित्राच्या मदतीने तिला धमक्या देत बळजबरीने मोटरसायकलवर बसवून गावाबाहेर बायपास वरील निवांत लॉजवर नेले. एका खोलीत नेऊन तिच्या इच्छेविरोधात शारीरिक अत्याचार केले.

याची वाच्यता कुठे केली तर ठार मारण्याची धमकीही दिली. पीडितेच्या तोंडी तक्रारी वरून मेहकर पोलिसांनी आरोपी मोहन उर्फ राज चव्हाण, (वय २० राहणार खंडाळा, तालुका मेहकर )तसेच ओम प-हाड (२०, रा. बाभुळखेड, ता. मेहकर) या दोघांविरोधात पोक्सो, अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदानुसार गुन्हा दाखल केला आहे.

मेहकर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र, घटनेचे गंभीर्य आणि पोकसो, एॅट्रॉसिटी कायद्यातील तरतुदी नुसार या दुर्दैवी घटनेचा तपास मेहकरचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील करीत आहे. या घटनेमुळे मेहकर तालुक्यात खळबळ उडाली असून आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

## बलात्कार प्रकरणातील फरार आरोपीस अटक

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.१७, किनवट (नांदेड) :** उमरखेड तालुक्यातील खरबी जंगलातील बलात्कार प्रकरणातील फरार झालेले आरोपी १५ जानेवारी रोजीच्या रात्रीच उपविभागीय पोलीस अधिकारी मळघणेच्या तपासातून हाती लागले आहे. फरार झालेल्या आरोपीची संख्या दोन वरून तीनवर गेल्याने आता एकूण आरोपीची संख्या चार वर गेली आहे.आरोपी फरार झाल्याने पोलिसासमोर सुरुवातीला आव्हान वाटत होते. परंतु बलात्कारी हाती लागल्याने आव्हान मोडीत निघाले हे विशेष आशा वर्करची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून प्राथमिक आरोग्य केंद्र बोधडी (बु.) तील आरोग्य सेवक विठ्ठल मुंडे कंधारकर यांने २३ वर्षीय युवतीवर जबरी बलात्कार केल्याची संताप जनक घटना १३ जानेवारी रोजी विदर्भातील उमरखेड तालुक्यातील खरबी अभयारण्यात घडविण्यात आली. दरम्यान दराटी येथील प्रफुल उत्तम झंजाळकर, अब्दुल अजीज मसूद पठाण आणि शाहरुख मिर्झा कुरेशी या तिघांनी मुंडेच्या समोरून सदर युवतीस जंगलात ओढून नेऊन जबरी बलात्कार करून व्हिडिओ चित्रीकरण सुद्धा केले. फेसबुक वर व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्या पर्समधील तीस हजार रुपये लुटल्याची संताप जनक घटना घडली असल्याचे सांगण्यात आले. या चारही आरोपींना न्यायलासमोर उभे करण्यात आल्यानंतर पोलीस कोठडी मिळणार न्यायालयीन कोठडी मिळणार याकडे अनेकांचे लक्ष लागून दिसते. या युवतीस न्याय न मिळाल्यास आंदोलन छेडणार असल्याचा इशारा देण्यात आल्याचे सूत्रांकडून ऐकायला मिळाले.

## अवैधपणे अग्नि शस्त्र बाळगणाऱ्याला पोलिसांनी केले जेरबंद



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१७, अंबरनाथ (ठाणे) :** दि.१७ रोजी अंबरनाथ पोलीस ठाणे नेमणुकीतील तपास पथकातील पोलीस हवालदार संजय चव्हाण सपोनि विजय कजारी यांना गुप्त बातमीदारमार्फत माहिती मिळाली की एक इसम डीएमसी कॉर्नर बंद कंपनी मागील रोडवर अग्निशस्त्र घेऊन येणार आहे, सदर बातमीच्या अनुषंगाने तपास पथकाची टीम तयार करून बातमी प्रमाणे बंद डीएमसी कंपनी मागील रोडवर सापळा लावून प्रथमेश उर्फ लकी सुधाकर लोंढे वय १९ वर्ष राहणार भीम नगर कानसई रोड अंबरनाथ पूर्व यास ताब्यात घेऊन पंचा समक्ष अंग झडती घेतली असता त्याचे ताब्यामध्ये एक गावठी बनावटीचे स्टीलचे पिस्टल (अवैध अग्नी शस्त्र )तसेच तीन जिवंत राऊंड मिळून आले. सदर बाबत गुन्हा रजी. नं ९४ /२०२५ भारतिय हत्यार कायदा कलम ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१),१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर इसमास अटक करण्यात आले आहे. सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त परिमंडल ०४ चे सचिन गोरे, सापोआ शैलेश काळे यांचे मार्गदर्शनाखाली वपोनी बालाजी पांढरे पोनि किशोर शिंदे सपोनि /विजय काजारी पोहवा /६६६७ संजय चव्हाण, पोहवा/२७०जाधव, पो.ना./६३९५हेमंत पाटील, पोशि/४२७८ मुरलीधर गवळी, पो शि /८००९ मंगेश सूर्यवंशी यांनी केलेली आहे.

## मुंबईत कर्नाक बंदर पुलाच्या कामासाठी मध्य रेल्वेचा २६ जानेवारी रोजी विशेष ब्लॉक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१७, मुंबई :** मुंबईत सीएसएमटी ते मस्जिद बंदर स्थानक दरम्यानच्या १५४ वर्षे जुन्या आणि धोकादायक कर्नाक उड्डाणपुलाचे तोडकाम १९ नोव्हेंबर २०२२ रोजी २७ तासांचा मेगा ब्लॉक घेवून पाडण्यात आले होते. मात्र त्यानंतर काही दिवसात सदर पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. सध्या या पुलाचा मूळ पाया उभारणीचे पूर्ण झाले असून युद्धपातळीवर सुरू आहे, दुसऱ्या बाजूला म्हणजे टाटा कंपनीच्या दिशेला पुलावर टाकण्यात येणाऱ्या गर्डर उभारणीचे काम ही युद्ध पातळीवर सुरू आहे. दुसरा गर्डर स्थापित करून नवीन कर्नाक उड्डाणपूल जून २०२५ पर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

दरम्यान याच गर्डर उभारण्याच्या काम ासाठी मध्य रेल्वेने २५ जानेवारीची मध्यरात्र ते २६ जानेवारीच्या पहाटे पर्यंत ६ तासांचा विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घोषित केला आहे.



या ब्लॉकमुळे रात्री उशीरा धावणाऱ्या उपनगरीय आणि लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांवर परिणाम होणार आहे. मुंबई महापालिकेकडून कर्नाक पुलाची पुनर्बांधणीचे काम सुरू अतिशय वेगाने सुरू आहे. पुलासाठी ५५० मेट्रिक टन वजनाचा, उत्तर बाजूचा गर्डर महापालिकेच्या हद्दीत ९.३० मीटरपर्यंत सरकवण्याची प्रक्रिया १४ जानेवारी रोजी पूर्ण करण्यात आले आहे. या पुढील काम रेल्वे हद्दीत असल्याने ते पूर्ण करण्यासाठी मुंबई महापालिकेने मध्य रेल्वेकडे ब्लॉकची मागणी केली होती.

शनिवार, दिनांक १८ जानेवारी २०२५ ची मध्यरात्र ते रविवार, दिनांक १९ जानेवारी २०२५ ची पहाट या दरम्यान मध्य रेल्वेने ब्लॉकचे नियोजन केले होते. मात्र रविवारी मुंबई मॅरेथॉन असल्याने रात्री उशिरापर्यंत विशेष लोकल चालवण्यात येणार आहेत. यामुळे २५ जानेवारी मध्यरात्र ते २६ जानेवारी पहाटेपर्यंत ब्लॉक मंजूर करण्यात आला आहे, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान कर्नाक पूलाची पाडणी झाल्यानंतर, दक्षिण मुंबईतील मशिद परिसर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसर आणि मोहम्मद अली मार्ग परिसरात प्रचंड वाहतूककोंडी निर्माण होत आहे. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी कर्नाक पूलाची पुनर्बांधणी नियोजनबद्ध वेळेत पूर्ण करण्याकडे मुंबई महापालिकेचा कल आहे. तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्म क असलेले काम महापालिकेचे प्रमुख अभियंता आणि संबंधित अधिकारी यांच्यासह तज्ज्ञांच्या म ार्गदर्शनाखाली पार पडत आहे. दुसरा गर्डर स्थापित करून नवा कर्नाक उड्डाणपूल जून २०२५ पर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे मुंबई महापालिकेचे नियोजन आहे.

## केळीची बाग अज्ञात व्यक्तीने कापली शेतकरी आर्थिक संकटात



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१७, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथिल शेतकरी सोमनाथ चंद्रे यांच्या शेतातील केळी पिकाचे २५० ते ३०० झाडे ही अज्ञात व्यक्तीने कापून टाकली. यामुळे शेतकऱ्यांचे अंदाजे ९० हजार रुपये चे नुकसान झाले आहे. दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास सदरील प्रकार घडला. शेतकऱ्यांच्या हाता- तोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे. शेतकरी आपल्या शेतातील पिकांना जीवापलीकडे जपत असतो पण मुदखेड शहरांपासून काही अंतरावर असलेल्या केळीच्या बागेवर कत्ता चालून सुमारे २५० ते ३०० झाडे अज्ञात व्यक्तीने कापण्याचा प्रकार गुरुवार, दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. शेतकरी सोमनाथ चंद्रे हा शुक्रवार, दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी पहाटे आपल्या शेतात गेला असता सदरील प्रकार उघडकीस आला. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. मुदखेड शहरातील प्रगतशील शेतकरी सोमनाथ चंद्रे व त्यांचे कुटुंब कष्ट व जिद्दीने आपली शेती करतात त्यांनी आपल्या शेतात केळी पिकाची लागवड केली होती. हातातोंडाशी आलेला घास या कृत्यामुळे हिरावून गेला आहे. याप्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका चंद्रशेखर मुंडे हे करत आहेत.

## वाशी तहसील कार्यालयावर जाणिव संघटनेचा आक्रोश मोर्चा

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१७, कळंब (धाराशिव) :** वाशी तहसील कार्यालयावर जाणीव संघटनेच्या वतीने संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार, दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी आक्रोश म ोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चामध्ये संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजनेचे पेन्शन परिपत्रका प्रमाणे दरमहा वाटप करा, सन २००३ पासून केंद्र शासनाचे २०० रुपये हिस्सा प्रम ाणे सर्व लाभधारकांना समान पेन्शन वाटप करा, एकल महिला, विधवा, परितक्त्या, गरीब निराश्रीत लाभार्थ्यांना रु (२१०००) वार्षिक उत्पन्न अट रद्द करण्यात येऊन त्यात (५१०००) रुपये वाढ करून नागरीकांना योजनेचा लाभ




देण्यात यावा.

विभक्त कुटुंबांना शिधापत्रिका देऊन त्यांना धान्य उपलब्ध करून द्यावे, गावोगावी मागासवर्गीय पारधी अल्पसंख्यांक यांना स्मशानभूमी करीता जागा उपलब्ध करून द्यावी. तसेच ज्या ठीकाणी स्मशान भुमी उपलब्ध आहे. त्या ठिकाणच्या स्मशानभूमीची नोंद करून त्या ताब्यात देण्यात याव्या, वाशी तालुक्यातील गायरान जमीनीवर अतिक्रमण केलेल्या शेतकर्यांना सातबारा द्या, दलित आदिवासींना समाज बांधवांवर होणारे अन्याय अत्याचार थांबवा. अशा आशयाच्या मागण्या या वेळी मार्चात करण्यात आल्या. सदरील मोर्चाची सुरुवात पारा चौकातून करण्यात येऊन शिवाजीनगर मार्गे तहसील कार्यालयावर धडकला.

तसेच संघटनेच्या वतीने तहसीलचे नायब तहसीलदार शिंदे यांना जे.जे. तवले,जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे, शेषराव गाडे यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले. तर म ोर्चाच्या ठिकाणी स्व.संतोष देशमुख व स्व.सोमनाथ सूर्यवंशी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या मार्चला मधुकर गायकवाड, भीमराव पवार, रत्नदीप गाडे, नवनाथ शिंदे, भागवत काळे, दिलीप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या मोर्चामध्ये अब्दुल तांबोळी, शहानुर पठाण, किरण लगाडे, पंढरी मुळे, सुनील बनसोडे, रावसाहेब गायकवाड, रामलिंग घुले, विनोद शिंगारे, भिकाजी गरड, यांच्या सह वाशी तालुक्यातील २०० ते अडीचशे लोक मार्चात सहभागी झाले होते.

## भानेगाव ग्रामपंचायतला ८० लाख रुपयांच्या विकास कामाला मंजूरी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** जिल्हा वार्षिक योजना (नागरी सुविधा) २०२३-२०२४ अंतर्गत भानेगाव ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या विविध वार्डात सिमेंट रस्त्याच्या कामाला ८० लाख रुपयांच्या कामाला मंजुरी मिळाली असून पहिल्या टप्प्यात प्रत्यक्षात ५५ लाख रुपयांच्या कामाला सुरुवात झाली आहे. भानेगाव ग्रामपंचायतच्या सरपंच शालिनी चवरे यांनी वार्ड क्रमांक १ ते ५ अंतर्गत असलेल्या वार्डात सिमेंट रस्ता व विविध कामांसाठी नागपूर जिल्हा परिषदे मार्फत जिल्हा नियोजन समितीकडे ८० लाख रुपयांचे प्रस्ताव सादर केले होते. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार डॉ. आशिष देशमुख व भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. राजीव पोतदार यांच्या प्रयत्नाने जिल्हा वार्षिक योजना (नागरी सुविधा) अंतर्गत ८० लाख रुपयांच्या विकास कामांना मंजुरी मिळाली. पहिल्या टप्प्यात ५५ लाख रुपयांची विकास कामे करण्यात येणार आहे. सदर सिमेंट रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्षात १७ जानेवारीला वार्ड क्रमांक ३ पासून सुरुवात करण्यात आली आहे. दुसऱ्या टप्प्यात २५ लाख रुपयांची विकास कामे करण्यात येणार आहे.

## रस्ता सुरक्षा अभियान २०२५ कोळसेवाडी येथे भव्य उद्धाटन सोहळा संपन्न

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७ कल्याण (ठाणे) :** रस्ता सुरक्षा अभियान-२०२५ चा ३५ वा कार्यक्रम कोळसेवाडी वाहतूक उपविभाग कार्यालय, चक्कीनाका येथे आज, दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी, दुपारी १६:०० ते १७:३० या वेळेत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात ठढझ शिक्षक सुभाष गायकवाड यांच्या सूत्रसंचालनाने झाली. दीपप्रज्वलन



करून आणि महाराष्ट्र राज्यगीताच्या गायनाने उद्धाटन सोहळ्याला प्रारंभ करण्यात आला. कोळसेवाडी वाहतूक शाखेचे पोलीस नाईक श्याम ढाकणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. रस्ता सुरक्षा अभियानाचा हेतू, अपघात कमी करण्याच्या उपाययोजना, आणि जनजागृती मोहिमेच्या महत्त्वाबाबत त्यांनी सखोल माहिती दिली.

कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करत ठाणे वाहतूक पोलीस विभागाच्या कार्याचे कौतुक केले आणि अभियानाला शुभेच्छा दिल्या. सेंट विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक संदीप परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या बँड वादनाने उपस्थितांची मने जिंकली.

रस्त्यावर वाहतूक नियमनाम ध्ये मदत करणाऱ्या व्यक्ती, RSP शिक्षक, शाळा व महाविद्यालयांचे मुख्याध्यापक-प्राचार्य, समाजसेवक, तसेच पत्रकार यांचा सन्मान करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर यांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करत उपस्थितांना प्रेरित केले.

## संपादकीय



### चीनचा खोडसाळपणा

भारताचा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव कायम वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला.

कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. मागील वर्षी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले होते. या नकाशात त्याने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनमध्ये दाखवले इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. भारताच्या निषेधानंतरही चीन भारताच्या खोड्या बंद करत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे यावेळी चीनने भारताच्या लडाखमध्ये दोन नव्या काऊंट्याची घोषणा करत घुसखोरी केली. पंधरा दिवसापूर्वीच भारताच्या हे लक्षात आले भारतीय लष्कराने आणि परराष्ट्र मंत्रालयाने याचा चीनला जाब विचारला आहे. चीन एवढ्या वरच थांबला नसून चीनने आता भारताशी वॉटर वार सुरू केले असून चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर मोठा जल प्रकल्प सुरू केला आहे या जल प्रकल्पामुळे भारताला भविष्यात मोठ्या जल संकटाला सामोरे जावे लागणार आहे . दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. मागील वर्षी चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अशा अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२५ चा भारत आहे.

चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे त्यामुळेच भारताशी थेट पंगा न घेता अशा छोट्या मोठ्या खोड्या काढून भारताला त्रास देण्याचे धोरण चीनने अवलंबले आहे.

# स्टार्टअप इंडिया : इकोसिस्टमला प्रोत्साहन

**प्रविण बागडे**
**नागपूर मो.९९२३६२०९१९**

स्टँड-अप इंडिया ही योजना महिला आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समदायातील उद्योजकतेला पाठिंबा देण्यासाठी ५ एप्रिल २०१६ रोजी भारत सरकारने सुरू केली. हे स्टार्टअप इंडिया सामान आहे पण या योजनेचे भाग नाही. या दोनही योजना मेक इन इंडिया, इंडस्ट्रियल कॉरिडोर, डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर, सागरमाला, भारतमाला, उडान-आरसीएस, डिजिटल इंडिया, भारतनेट आणि उमंग या भारत सरकारच्या इतर योजनांचे समर्थक व लाभार्थी आहेत. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आणि महिला दरम्यान १० लाख आणि १ कोटी योजना ऑफर बँक कर्ज शेती क्षेत्राचा बाहेर नवीन उपक्रम सेट चा समावेश आहे.




स्टार्टअप म्हणजे अशी संस्था ज्याचे मुख्यालय भारतात आहे, १० वर्षांपूर्वी उघडले गेले आहे आणि ज्याची वार्षिक उलाढाल १०० कोटी पेक्षा कमी आहे. या योजनेसाठी सुरुवातीला २०००० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. स्टार्टअप इंडिया उपक्रमांतर्गत, इनक्यूबेटर फ्रेमवर्कचा उद्देश भारतातील स्टार्टअप्सच्या वाढीसाठी पायाभूत सुविधा, मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य यासारखी आवश्यक संसाधने प्रदान करणे आहे. भारतात ४०० हून अधिक इनक्यूबेटर आहेत, त्यापैकी बहुतेक सुरुवातीचा टप्पा. स्टार्टअप इंडियाचे उद्दिष्ट विद्यमान इनक्यूबेटरच्या क्षमता वाढवणे आणि नवीन इनक्यूबेटर स्थापित करण्यासाठी समर्थन प्रदान करणे आहे.

स्टार्टअप इंडियाकडून स्टार्टअप इनक्यूबेटर म्हणून मान्यता मिळाल्याने, स्टार्टअप्सना आर्थिक प्रोत्साहने, कर लाभ आणि सरकारी मदत असे विविध फायदे मिळू शकतात. स्टार्टअप इंडियाचे इनक्युबेशन पार्टनर बनण्यासाठी, संस्थांना सरकारी नियमांचे पालन करून अर्ज करणे आवश्यक आहे आणि संस्था अनुदान, मार्गदर्शन, नेटवर्क आणि भांडवल यासारख्या आवश्यक संसाधनांद्वारे स्टार्टअप्सना सक्षम करण्यासाठी काम करतात. या उपक्रमाशी संबंधित एक अतिरिक्त क्षेत्र म्हणजे या क्षेत्रातील प्रतिबंधात्मक राज्य सरकारच्या धोरणांना काढून टाकणे, जसे की परवाना राज, जमीन, परदेशी गुंतवणूक प्रस्ताव आणि पर्यावरणीय मंजुरी यांच्याशी संबंधित धोरणे. हे उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभाग - औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभागाने आयोजित केले होते.

या योजनेचा उद्देश भारतात उत्पादन, वाहतूक, ऊर्जा, आरोग्य, शिक्षण, शेती, पाणी, स्वच्छता इत्यादी विशिष्ट क्षेत्रांमध्ये स्टार्टअप्सना समर्थन आणि प्रोत्साहन देणारी इनक्यूबेशन सेंटर्स स्थापित करणे आणि त्यांना आवश्यक पायाभूत सुविधा प्रदान करणे हा आहे. पायाभूत सुविधा आणि इतर मूल्यवर्धित सेवा प्रदान करा. समावेशक विकासाला पाठिंबा देण्यासाठी अविकसित आणि वंचित प्रदेशांमध्ये अटल इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्यावर देखील या योजनेचा भर असेल. अधिक माहिती आणि तपशीलवार वर्णनासाठी, तुम्ही इनक्युबेटर फ्रेमवर्क पृष्ठाला भेट देऊ शकता. स्टार्टअप इंडिया इनिशिएटिव्ह ही एक सरकारी उपक्रम आहे ज्याचा उद्देश भारतीय स्टार्टअप इकोसिस्टमला प्रोत्साहन देणे आणि पाठिंबा देणे आहे. या प्रक्रियेत इनक्युबेशन पार्टनर्स महत्त्वाची भूमिका बजावतात. इनक्युबेशन पार्टनर ही एक संस्था किंवा संस्था आहे जी स्टार्टअप्सना ऑपरेशनल, तांत्रिक आणि व्यवसाय समर्थन प्रदान करते.

स्टार्टअप इंडियामध्ये सामील होण्याच्या प्रक्रियेत स्टार्टअप इंडिया पोर्टलवर नोंदणी करणे, स्टार्टअप माहिती, उद्दिष्ट आणि कार्यक्षेत्र असलेले अर्ज भरणे, इनक्यूबेटर प्रोग्राम साठी संपूर्ण आणि तपशीलवार प्रकल्प अहवाल (व्यवसाय प्रस्ताव) सादर करणे ई. पायऱ्या असतात. तसेच, अर्जदार संस्था संलग्न स्टार्टअप इनक्यूबेटर असणे आवश्यक आहे, तांत्रिक किंवा व्यवसायिक सहाय्य प्रदान करण्याचा अनुभव आणि क्षमता आवश्यक आहे. भारतीय स्टार्टअप इकोसिस्टमला बळकटी देण्यासाठी कायदेशीर नोंदणी आणि इतर औपचारिकता पात्रतेच्या निकषाकरीता आवश्यक आहेत.

इनक्यूबेटर निवड प्रक्रियेचा उद्देश अशा संस्थांची ओळख पटवणे आहे जे स्टार्टअप्सना चांगली संसाधने आणि संधी प्रदान करू शकतात. इनक्यूबेटरचे नेटवर्क किती मोठे आणि प्रभावी आहे हे विचारात घेतले जाते. व्यावसायिक प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि समुपदेशन, तंत्रज्ञान, सुविधा आणि कामाच्या जागेची उपलब्धता, सरकारी सहाय्य कार्यक्रमांचे धोरणात्मक सूचना आणि फायदे, आर्थिक आणि गैर-आर्थिक प्रोत्साहने, सक्षम इनक्यूबेटर ते स्टार्टअप्सना भांडवली गुंतवणूक, योग्य संसाधने, गुंतवणूकदार नेटवर्क आणि इतर व्यवसाय-संबंधित समर्थन प्रदान करतात. **सर्व स्टार्टअप उद्योजकांना स्टार्टअप दिनाच्या शुभेच्छा !**

## लक्ष्मीबाई सोनुले यांचे निधन

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**
**दि.१७, हदगांव (नांदेड) :**
शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलीत पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी अध्यक्ष दिवंगत चांदराव तुकाराम सोनूले यांच्या पत्नी लक्ष्मीबाई चांदराव सोनुले (१०२) यांचे वर्धोपकाळाने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी शनिवार, दिनांक १८ जानेवारी २०२५ ला हदगाव येथील श्री दत्त कला वाणिज्य महाविद्यालयाच्या पाठीमागे त्यांच्या शेतात दुपारी १२ वाजता आहे. लक्ष्मीबाई सोनूले या पंचशील उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रा.कैलास सोनुले यांच्या आई होत.

### हुकूम..

आता रिझल्ट हवा
वरतून आला हुकूम
आरोपी धरले धरले
सर्वत्र चाले टामटूम

कबूल करायचागुन्हा
वाटत फिरावे गोधूम
लावले विभीन्नकलम
रे वागायचे बरहुकूम

वदवून घ्यावा जबाब
कोठडीत करे जुलूम
सुपारी कुणी दिलेली
कबूल करी बेमालूम

तयार होई चार्जशीट
चाले नवीन धामधूम
दबाव वाढता चौफेर
पोलिसहोई घामघूम

कलमे लावा सगळी
फुलारून येई कुसुम
काळीज करावे घट्ट
आरोपी नाही मासूम

काळहेचं औषध खरे
नंतर सर्वत्र सामसूम
शमतीलंदमतीलं सर्व
फटाके ते धडाड् धूम

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# जनाब, जावेदजी अख्तर!

**जावेद अख्तर यांचा जन्म दिनांक १७ जानेवारी १९४५ रोजी ग्वाल्हेर येथे झाला. त्यांचे वडील जान निसार खान हेदेखील हिंदी चित्रपटसृष्टीत गीतकार आणि कवी होते. जावेद यांचे शालेय शिक्षण लखनौ येथे आणि महाविद्यालयीन शिक्षण भोपाळमधील सोफिया कॉलेजमध्ये झाले.**

जावेद अख्तर यांनी सुरुवातीच्या काळात कैफी आझमी यांचे साहाय्यक म्हणून काम पाहिले. तसेच याकाळात एका चित्रपटाकरिता संवादही लिहिले; पण त्यात त्यांना फारसे यश मिळाले नाही. सरहदी लुटेरा या चित्रपटाच्या कामावेळी त्यांची सलीम खान यांच्याशी भेट झाली. सलीम-जावेद या जोडीने अधिकार-१९७१ आणि अंदाज या चित्रपटासाठी प्रथमतः एकत्र कथा-पटकथा संवाद लिहिले. सलीम खान हे कथा लिहीत असत आणि जावेद अख्तर त्यांना संवादलेखनात मदत करीत असत. अंदाज आणि अधिकार या चित्रपटानंतर सलीम-जावेद यांनी सीता और गीता-१९७२, यादों की बारात-१९७३, जंजीर-१९७३, हाथ की सफाई-१९७४, दीवार-१९७५, शोले-१९७५, चाचा भतिजा-१९७७, डॉन-१९७८, त्रिशूळ-१९७८, दोस्ताना-१९८०, क्रांती-१९८१, जमाना-१९८५, मिस्टर इंडिया-१९८७ या आणि अशा एकूण २२ हिंदी आणि दोन कन्नड चित्रपटांच्या कथा-पटकथा आणि संवाद लिहिले. त्यांनी लिहिलेल्या चोवीस चित्रपटांपैकी आखरी दाँव, इमान धरम, काला पत्थर आणि शान हे चार चित्रपट सोडल्यास बाकीच्या चित्रपटांनी तिकीटबारीवर उत्तम यश संपादन केले.

जावेद अख्तर आणि सलीम खान या जोडीमुळे सिने पटकथाकार या भूमिकेला एक विशिष्ट दर्जा प्राप्त झाला. चित्रपटाच्या जाहिरात पृष्ठावर कथा-पटकथालेखक तसेच संवादलेखक यांचे नाव यायलाच हवे असा त्यांचा आग्रह असे. सन १९८२नंतर मात्र सलीम-जावेद जोडीत बेबनाव होऊन ते वेगवेगळे झाले. यानंतर जावेद अख्तर कथा-पटकथालेखक आणि त्याचबरोबर गीतकार म्हणूनही स्वतंत्रपणे उदयास आले. त्यांनी स्वतंत्रपणे लिहिलेल्या चित्रपटांत बेताब-१९८३, मशाल-१९८४, सागर-१९८५, अर्जुन-१९८५, मेरी जंग-१९८५, डकैत-१९८७,= लक्ष्य-२००४ आणि डॉन-द चेस बिगिन्स अगेन-२००६ हे चित्रपट उल्लेखनीय समजले जातात. त्यांनी ८०हून अधिक चित्रपटांकरिता गाणी, कथा-पटकथा आणि संवाद लिहिले आहेत.



गीतकार म्हणून जावेद अख्तर यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. जनसामान्यांसाठी सहज, सोपी आणि उडत्या चालींची गाणी तर त्यांनी लिहिली आहेतच; पण त्याचबरोबर अत्यंत तरल आणि अर्थगर्भ गीतेही लिहिली आहेत. ''तुमको देखा तो ये खयाल आया'', ''संदेसे आते है'', ''एक लडकी को देखा तो ऐसा लगा'', ''पंछी, नदियाँ, पवन के झोंके'' या आणि अशा अनेक गीतांमधून त्यांनी मानवी मनातील भावभावनांचा कोलाज उभा केला आहे. साज (मेलडी-१९९७), बॉर्डर-१९९७), गॉडमदर-१९९९, रेफ्युजी-२००० आणि लगान-२००१ या चित्रपटांतील माणसाच्या जगण्याचा तळ शोधणाऱ्या गीतांसाठी जावेदजी यांना उत्कृष्ट गीतकार म्हणून पाच वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. तसेच तरकश आणि लावा हे त्यांचे कवितासंग्रह देखील रसिकांच्या पसंतीस उतरले आहेत. त्यातील लावा या कवितासंग्रहास उर्दू भाषेतील ''साहित्य अकादमी'' पुरस्कार प्राप्त झाला आहे.

जावेद अख्तर यांच्या पहिल्या पत्नीचे नाव हनी इराणी आहे. हनी इराणी याही पटकथा लेखाकार आहेत. या दोघांना फरहान आणि झोया ही दोन मुले झाली. फरहान अख्तर हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माता व अभिनेता आहे. तर झोया अख्तर याही यशस्वी चित्रपटनिमिती व दिग्दर्शक म्हणून कार्यरत आहेत. जावेद अख्तर यांनी हनी इराणींपासून विभक्त झाल्यावर हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री शबाना आझमी यांच्याशी विवाह केला. जावेद यांनी फरहान यांच्याबरोबर दिल चाहता है, लक्ष्य, रॉक ऑन आणि मुलगी झोया बरोबर जिंदगी ना मिलेगी दोबारा या चित्रपटांवर काम केले आहे.

जावेदजी अख्तर यांना भारत सरकारने चित्रपटातील उत्कृष्ट कारकीर्दीसाठी १९९९ साली ''पद्मश्री'' आणि नंतर २००७ साली ''पद्मभूषण'' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले आहे. तसेच जावेद अख्तर यांनी त्यांच्या कारकीर्दीत उत्कृष्ट गीत, संवाद आणि कथेसाठी अनेक फिल्मफेअर पुरस्कारही मिळवले आहेत.

बुद्धिवादाला सदैव साक्षी ठेवणाऱ्या आणि पारंपरिक, श्रद्धाळू विचारसरणीला धिक्कारणाऱ्या जावेद अख्तर यांनी आपल्या जाहीर वक्तव्यांतून आणि साहित्यकृतींतून धर्मनिरपेक्षता आणि मानवी हक्क या लोकशाही मूल्यांचा निर्भिडपणे पुरस्कार केला आहे. सन २०२० साली ''रिचर्ड डॉकीन्स'' पुरस्काराने त्यांच्या या भूमिकेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला आहे. कलात्मकतेला जोपासत व्यावसायिकता सांभाळणाऱ्या आणि भारतीय समाजातील विविधतेवर प्रेम करणाऱ्या या मनस्वी कलावंताला भारतीय चित्रपटसृष्टीत मानाचे स्थान आहे.

अलीकडेच गीतकार जावेद अख्तर यांनी एका शोमध्ये गाणेट लिहिण्यास का होकार दिला? याचा खुलासा केला. ते म्हणाले, मी सहसा चित्रपटात फक्त एकच गाणं लिहित नाही. राजू हिराणी सरांनी मला फक्त एका गाण्याचे बोल लिहायला सांगितले. मी नकार दिला, पण ते आग्रहाने म्हणाले, 'हे गाणे आपल्या शिवाय कोणीही लिहू शकत नाही.' यानंतर मी त्याच्यापुढे काही अटी ठेवल्या आणि मग ते लिहिले. जावेद अख्तर पुढे म्हणाले, त्यांनी डोळे न बघता त्या अटी मान्य केल्या. हा माझा चमत्कार नाही, हा राजू हिराणीचा चमत्कार आहे, ज्यांच्या मागे ५ सुपर-डुपर हिट चित्रपट होते, त्यांना समजले की मला या माणसाकडून हे गाणे मिळेल. अहंकार त्यांच्यावर जबरदस्त नव्हता, उलट त्यांच्या चित्रपटावरील प्रेम त्यांच्यावर जबरदस्त होता. त्याला सलाम!

**!! आज जावेदजींचा वाढदिवस, त्यानिमित्त त्यांना आभाळ भरभरून हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## 'गांधी बाल मंदिर'मध्ये भारतीय सेना दिन साजरा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** देशात दरवर्षी १५ जानेवारी हा दिवस भारतीय लष्कर दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी देशाचे पहिले सेनाध्यक्ष फील्ड मार्शल के. एम. करियप्पा यांनी आपल्या पदाचा भार स्वीकारला होता म्हणून हा दिवस इंडियन आर्मी दिवस म्हणून सर्वत्र साजरा होत असतो. यावेळी गांधी बालमंदिर हायस्कूल येथे श्री महाराष्ट्र बटालियन आर्मी युनिटच्या वतीने हा दिवस साजरा झाला. यावेळी विविध माहिती व युद्धपर फिल्म विद्यार्थ्यांना दाखवण्यात आल्या. सदर कार्यक्रमा मध्ये अवधूत चव्हाण, अमोल जागले, रत्नकांत विचारे, उत्तम साळवी यांनी सहभाग घेतला. सदर कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे एनसीसी ऑफिसर विश्वनाथ पांचाळ यांनी केले होते. यावेळी शाळेचे पर्यवेक्षक रवींद्र खोंडे तसेच मुख्याध्यापक अनिल पांचाळ यांनी या दिवसासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## पाडाळे तलाव परिसरातील स्थानिकांनी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था नोंदणीसाठी प्रस्ताव सादर करावेत

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, मुरबाड (ठाणे) :** जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील पाडाळे (ल.पा.) योजना तलाव हा नव्याने बांधून पूर्ण झाला असल्याने या तलावाचे मासेमारी हक्क मत्स्यव्यवसायाकरिता ठेक्याने देण्यासाठी कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प, बांधकाम विभाग, शहापूर यांच्याकडून या तलावाचे मासेमारी हक्क मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरित झालेले आहेत. त्यानुषंगाने पाडाळे (ल.पा. योजना) तलावाच्या जलक्षेत्रावर शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि- २०१६/ प्र.क.१७१ (भाग-१) पदुम- १३ दिनांक- ०३ जुलै २०१९ नुसार या तलाव/ जलाशयांच्या बाधित गावांमधील तसेच तलाव / जलाशयाच्या १० किलोमीटर परिघाच्या परिसरातील गावातील लोकांना/ प्रकल्प बाधितांना मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था नोंदणी करिता आवाहन करण्यात आले आहे.

**प्रकल्पाचे नाव :** पाडाळे (ल.पा.) योजना, तालुका, जिल्हा:- मुरबाड, ठाणे, कमाल जलक्षेत्र:- ९६.५४८ हेक्टर, किमान जलक्षेत्र:- १७.०५४ हेक्टर, सरासरी जलक्षेत्र:- ५६.७९५ हेक्टर.

तरी तलावाच्या १० किलोमीटर परिघाच्या परिसरातील स्थानिकांनी / कार्यक्षेत्रातील गावातील प्रकल्पबाधितांनी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था नोंदणी करून घेण्यासाठीचे प्रस्ताव सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), कोकण भवन, नवी मुंबई या कार्यालयाकडे सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) ठाणे-पालघर दिनेश पाटील यांनी केले आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यात मूलीचा दुर्दैवी मृत्यू



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील खडकवाडीतील रोकडे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता ३ रीत शिकणारी कु. ईश्वरी पांडुरंग रोहकले हिचा राहत्या घरी बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. कु. ईश्वरी सदैव हसतमुख असणारी गुणी व हुशार मुलगी होती. तिच्या मृत्यूबद्दल हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी घेतली कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. यावेळी त्यांनी याबाबत सरकाराकडे पाठपुरावा करून १० लाख रुपये मदत मिळवुन देणार असल्याचे सांगितले. तसेच अनेक दिवसांपासुन पारनेर तालुक्यात बिबट्याने धुमाकूळ घातला आहे. तक्रार करुनही वन खाते मात्र निद्रिस्त अवस्थेत आहे, याचे दुःख व्यक्त केले.

यावेळी उपसरपंच शरद गागरे, शरद पाटील, शिवाजी शिंगोटे, सुभाष शिंदे, दिलीप पाटोळे, बाळासाहेब झावरे, किसन आहेर आदीं उपस्थित होते. दरम्यान, या घटनेने संताप व्यक्त करण्यात येत असून या नरभक्षक बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी होत आहे. ज्यांची मुले, मुली गावाबाहेरील वस्तीवरून प्राथमिक, माध्यमिक शाळेत येतात त्या विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## बालरोग तज्ञ डॉ.सुमित महाजन यांचा राज्यस्तरीय नीलरत्न पुरस्काराने गौरव



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, भुसावळ :** शहरातील नामवंत बालरोग तज्ञ डॉ.सुमित महाजन यांनी आरोग्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना निलेश राणे युवा प्रतिष्ठानकडून राष्ट्रीय गुन्हे नियंत्रण मंडळाचे राज्यमंत्री डॉ.निलेश राणे यांच्या हस्ते राज्यस्तरीय नीलरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

हा पुरस्कार त्यांना कमी वर्षामध्ये आरोग्य क्षेत्रात स्वतःचे एक पी.एम महाजन मेमोरियल या नावाने सुसज्ज रुग्णालय सुरू केले आहे. त्यामध्ये त्यांनी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करून अनेक ग्रामीण भागातील रुग्णांना मोफत उपचार देखील केले आहे, तसेच डॉ.सुमित महाजन यांना सामाजिक व राजकीय क्षेत्राची आवड असल्याने त्यांनी नुकताच भुसावळ येथे भाजपा पक्षात प्रवेश केला आहे. डॉ.सुमित महाजन यांचे प्राथमिक शिक्षण भुसावळ मध्ये झाले असून एमबीबीएस (बालरोग तज्ज्ञ) ही वैद्यकीय पदवी त्यांनी मुंबई व पुणे येथे पूर्ण केली आहे. डॉ.महाजन यांना राज्यस्तरीय नीलरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांना भुसावळ मधील अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## मंडणगड तालुक्यातील ४६ रुग्णाची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१७, मंडणगड (रत्नागिरी) :** रत्नप्रकाश हॉस्पीटल मंडणगड येथे आर.झनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल नवीन पनवेल यांच्या सहकार्य राबवण्यात आलेल्या मोफत नेत्र चिकीत्सा शिबीराचे माध्यमातून तालुक्यातील ४६ नेत्ररुग्णाची नवीन पनवेल येथे मोती बिंदू शस्त्रक्रीया यशस्वी करण्यात आली. शस्त्रक्रीयेकरिता पनवले येथे जाणे येणे प्रवास तेथील निवास आदी सर्व खर्च संस्थेच्यावतीने करण्यात आला. रत्नप्रकाश हॉस्पीटल मंडणगड यांच्यामाध्यमातून गेल्या पाच महिन्यात तालुक्यातील ९०० रुगणांची नेत्र चिकीत्सा करण्यात आली आहे व १५० नेत्ररुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. प्रत्येक महिन्याच्या पहील्या रविवारी नेत्रचिकीत्सा शिबीराचे आयोजन केले जाते. रत्नप्रकाश हॉस्पीटल व तालुक्यातील डॉक्टरानी राबविलेले दृष्टी दोष मुक्त मंडणगड तालुका हे अभियान यशस्वी करण्यासाठी डॉ.आशिष जाधव, डॉ.साक्षी जाधव, डॉ.उल्हास डंबे, डॉ.अमित गिरासे विशेष मेहनत घेत आहेत.

# टाकळी ढोकेश्वर येथे जिल्हास्तरीय चाचा नेहरु बाल महोत्सवाचा शुभारंभ




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या शासकीय स्वयंसेवी संस्थांमध्ये पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या अनाथ, निराधार, उन्मार्गी मुले व इतर बालकांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्यात एकमेकांविषयी बंधुभाव व सांघिक भावना निर्माण होण्यासाठी महिला व बालकल्याण विभागातर्फे टाकळी ढोकेश्वर येथील आदर्श ग्रामीण महिला मंडळ संचलित निराधार, बालकाश्रम बालगृह मैदानावर आयोजित जिल्हास्तरीय चाचा नेहरु बाल महोत्सवाचा शुभारंभ गुरूवारी (दि.१६) करण्यात झाला.

बाल महोत्सवाचे उद्घाटन बाल न्याय मंडळाच्या अध्यक्षा ॲड. नंदनवार यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी बाल कल्याण समितीचे अध्यक्ष जयंत ओहोळ होते.

प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रशेखर पगारे विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास नाशिक विभाग, मनोज ससे जिल्हा कार्यक्रम अधिकारी बालकल्याण जिल्हा अहमदनगर, महादेव जायभाये बालविकास प्रकल्प अधिकारी, निलेश राऊत बालविकास प्रकल्प अधिकारी, वैभव देशमुख, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, संजय सांगळे जिल्हा परिविक्षा अधिकारी, महेंद्र दराडे बाल विकास प्रकल्प अधिकारी, ॲड. नंदनवार सदस्या बाल न्याय मंडळ अहमदनगर, ॲड. अनुराधा येवले सदस्या बालकल्याण समिती, वर्षा खोळदकर सदस्या बालकल्याण समिती, तुषार कवडे बालकल्याण समिती यांची उपस्थिती होती.

चाचा नेहरु बाल महोत्सवाच्या निमित्ताने मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. बालकांनी बाल महोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या अंगी असलेले सुप्त क्रीडा व कला गुण प्रदर्शित करीत भविष्यात विविध क्षेत्रात नावलौकिक करावा, अशा शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या. कार्यक्रमाला जिल्ह्यातील ३५ निराधार, बालसंगोपन, निराश्रित, बालिकाश्रम, बालगृह, स्नेहालय बालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सूत्रसंचालन समुपदेशक वैभव देशमुख यांनी केले. आभार परिविक्षा अधिकारी रावसाहेब झावरे सर झावरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महिला व बाल कल्याण विभागाचे अधिकारी एन. बी. कराळे, विनायक आव्हाड, राजेंद्र हासे, सचिन तरवडे, डॉ. अरुण इथापे, सीएस संस्थेच्या जूई झावरे व चाईल्ड लाईन कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पिंपरीत ४०० एकरमध्ये होणार निरंकारी संत समागम !

## २४ जानेवारीपासून निरंकारी संत समागमात मानवतेचा महासंगम...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, पिंपरी (पुणे) :** महाराष्ट्राचा ५८ वा निरंकारी संत समागम सुरु होण्यास अवघे काही दिवस उरले असल्याने समागमाच्या पूर्वतयारीमध्ये लागलेले निरंकारी भाविक भक्तगण समागम स्थळ समतल व सुंदर बनविण्यासाठी त्यामधील प्रत्येक व्यवस्थेला अंतिम रुप देत आहेत.

समागमाच्या पूर्वतयारीमध्ये पुणे झोनसह संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो सेवादल स्वयंसेवक आणि भाविक भक्तगण सातत्याने आपल्या निष्काम सेवा अर्पण करत आहेत.पिंपरीतील मिलिटरी डेअरी फार्मच्या सुमारे ४०० एकरच्या विस्तीर्ण मैदानात शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ पासून हा तीन दिवसीय संत समागम सुरू होत असून त्याची सांगता २६ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. मुख्य सत्संग कार्यक्रम दररोज दुपारी २ वाजता सुरू होईल ज्यामध्ये अनेक वक्ते, गीतकार, कवी सद्गुरु आणि ईश्वराप्रती आपल्या मनातील भावना व्यक्त करतील. शेवटी रात्री ८ वाजल्यापासून सर्वांना सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांचा पवित्र आशीर्वाद लाभणार आहे.

मागील एक महिन्यांपासून महाराष्ट्रा व्यतिरिक्त इतर राज्यांतून निरंकारी भक्तगणांनी समागम स्थळांवर येऊन आपल्या निष्काम सेवांच्या माध्यमातून समागम स्थळाला एका सुंदर नगरीच्या रुपात परिवर्तित केले आहे. सर्व श्रद्धाळू ज्या उत्साहाने, आवडीने, भक्तिभावाने, मर्यादा व अनुशासनाचे पालन करत आपल्या सेवा निभावत आहेत ते पाहून जनसामान्य अत्यंत प्रभावित आहेत. समागम स्थळाचे हे अनुपम दृश्य आजूबाजूने जाणाऱ्या वाटसरूंना आणि स्थानिक नागरिकांना आकर्षण व उत्सुकतेचे केंद्र बनून राहिले आहे.

मानवतेच्या कल्याणासाठी आयोजित केलेल्या या संत समागमाचे साक्षी बनण्यासाठी समस्त भाविकांना व निरंकारी भक्तगणांना नुक्कड नाटक, बॅनर तसेच पुण्याच्या कानाकोपऱ्यात खुल्या प्रांगणांमध्ये सत्संगच्या माध्यमातून सादर आमंत्रित केले जात आहे ज्यायोगे त्यांनी या संत समागमामध्ये सहभागी होऊन आपले जीवन सार्थक करावे.

समागमात सहभागी होणाऱ्या सर्व भक्तगणांसाठी व्यापक स्तरावर निवासी तंबू, लंगर, कॅन्टीन, दवाखाने, सुरक्षा व्यवस्था, पार्किंग आणि रेल्वे स्थानक आणि बसस्थानकातून ये-जा करण्यासाठी वाहतूक व्यवस्था इत्यादीची यथोचित व्यवस्था करण्यात आली आहे.

समागम स्थळावर स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जात आहे. प्रकाशन विभागाकडून समागम स्थळावर वेगवेगळ्या ठिकाणी स्टॉल लावले जात आहेत. संत निरंकारी मिशनचे सचित्र दर्शन घडविण्यासाठी आकर्षक निरंकारी प्रदर्शनीचेही आयोजन केले जात आहे यासह एकूण आठ कार्यशाळा असलेली भव्य बाल प्रदर्शनी देखील असेल, प्रत्येक कार्यशाळा मुलांना आकर्षक आणि शैक्षणिक अनुभव प्रदान करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. हे सर्व सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनानेच शक्य झाले आहे.

भक्तिभावाने केल्या गेलेल्या या सर्व पूर्वतयारीमध्ये कुशलतेची एक सुंदर झलक पहायला मिळत आहे. निश्चितच या संत समागमामध्ये देश-विदेशातील विविधतेने नटलेल्या संस्कृतीची व सार्वभौमत्वाची छटा उमटलेली पहायला मिळेल आणि यामध्ये सहभागी होणारे समस्त भाविक भक्तगण अलौकिक आनंदाची प्राप्ती करत सद्गुरु व संतांच्या दिव्य वाणीने प्रभावित होऊन आपल्या जीवनाच्या मूळ उद्देशाकडे अग्रेसर होत प्रेमाभक्तीच्या भावनेचा विस्तार करतील. मानवतेच्या या महामेळाव्यासाठी प्रत्येक धर्मप्रेमी बंधू-भगिनींना आदरपूर्वक आमंत्रित करण्यात येत आहे.

# कोपरखैरणे विभाग कार्यालयात अचानक भेट देत आयुक्त डॉ.शिंदे यांनी केली कामकाज पाहणी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, नवी मुंबई (कोपरखैरणे) :** नवी मुंबईकर नागरिकांची महानगरपालिकेशी संबंधित सर्व कामे सुलभ व सोप्या पध्दतीने विनासायास व्हावीत याकडे आयुक्त डॉ.कैलास शिंदे विशेष लक्ष देत असून त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासकीय कामकाजाला गती देण्यावर भर दिला जात आहे.

यामध्ये 'शून्य प्रलंबितता' अर्थात 'झिरो पेन्डसी' हे सूत्र प्रमाण मानून त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

या अनुषंगाने प्रत्येक विभागामध्ये उपलब्ध असलेल्या नस्ती, कागदपत्रे यांचे डिजीटलायझेशन करण्याचे सूचित करण्यात आले असून कार्यालयांतील उपलब्ध अभिलेखाचे पुनर्विलोकन करणे तसेच शासकीय नियमानुसार अ, ब, क, ड कागदपत्रे स्वरूपात वर्गीकरण करणे याबाबत मोहीम राबविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यासोबतच विहित कालावधीनंतर नष्ट करावयाची कागदपत्रे यांचे निर्लेखन करून ते नियमानुसार नष्ट करण्याची कार्यवाही करावी तसेच जतन करून ठेवावयाचा अभिलेख वर्गवारीनुसार स्वतंत्ररित्या जतन करण्यासाठी मध्यवर्ती अभिलेख कक्षात पाठविण्याची कार्यवाही करण्याचीही प्रक्रिया जलद पूर्ण करून घेण्याचे निर्देशित करण्यात आलेले आहे.

सर्व कार्यालयांत अंतर्गत स्वच्छता करण्याची विशेष मोहीम हाती घ्यावी. त्यासोबतच जुन्या फर्निचरची योग्य रितीने विल्हेवाट लावावी असे सूचित करतानाच कार्यालय परिसराचीही स्वच्छता करावी व नीटनेटकेपणावर भर द्यावा तसेच अभ्यागत कक्षाच्या ठिकाणी हवा खेळती राहील याची काळजी घेण्याचे आयुक्तांनी निर्देशित केले आहे.

कार्यालयांमध्ये कर्मचारी व नागरिकांसाठी स्वच्छ व शुध्द पिण्याची पाणी व्यवस्था व स्वच्छ प्रसाधनगृह व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नागरिकांची महानगरपालिकेशी संबंधित करभरणा करणे अथवा इतर कामे सहजपणे व विहित वेळेत व्हावीत यादृष्टीने प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क रहावे असे सूचित करीत अधिका-यांनी नागरिकांना कार्यालयात भेटीची वेळ निश्चित करावी, ती ठळकपणे प्रदर्शित करावी व त्या वेळेत नागरिकांना भेटून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर तत्पर कार्यवाही करण्याचे आयुक्तांनी निर्देश दिले.

# नारिवली गावात पाच घरफोडया : गावातील महिला पोलीस स्टेशनला धडकल्या



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, नवी मुंबई (ठाणे) :** नारिवली गावांमध्ये घरफोड्या होत असल्यामुळे गावातील महिलामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यासाठी आमच्या नारिवली गावामध्ये पोलिसांची गस्त वाढवावी यासाठी नारिवली गावातील महिलांनी शिळ-डायघर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची भेट घेतली. गावामध्ये पाच ते सहा घरफोड्या आतापर्यंत झाल्या आहेत. आपण स्वतः लक्ष घालून लवकरात लवकर चोरट्यांना पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे. आणि पोलिसांची गस्ती वाढवावी अशी मागणी महिलांनी वरिष्ठांकडे केली आहे. सतत घरफोड्या होत असल्यामुळे लहान मुलांमध्ये, महिलांमध्ये नागरिकांमध्ये एक भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घरचे पुरुषमंडळी कामावर गेल्यामुळे रात्री घरात राहायला आता भीती वाटते आणि लहान मुले सुद्धा घाबरतात. सदर घटना लक्षात घेऊन सुरक्षेसाठी पोलिसांची गस्त ठेवण्यात येइल असे आश्वासन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले.

## श्री जे.आर. गुंजाळ इंग्लिश मिडियम स्कूल ज्यु. कॉलेज येथे बक्षीस वितरण संपन्न

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.१७, आळेफाटा (पुणे) :** श्री जे.आर. गुंजाळ इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, आळेफाटा येथे भव्य क्रीडा महोत्सव साजरा करण्यात आला. या महोत्सवामध्ये नर्सरी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.



क्रीडा महोत्सवात सॅक रेस, फ्रॉक जंप, लिंबू चमचा रेस, १०० मीटर धावणे, उंच उडी, थाळी फेक, गोळा फेक, आणि क्रिकेट यांसारख्या विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून कौशल्य प्रदर्शन केले आणि प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावले. आज दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी या विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अविनाश बाणखेले, मनसे पुणे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथभाऊ वाळुंज, तसेच प्राचार्य सारंगधर बावस्कार आणि उपप्राचार्य विठ्ठल म्हस्के उपस्थित होते. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मनसे पुणे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथभाऊ वाळुंज यांनी शाळेच्या शैक्षणिक तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना उत्तरोत्तर प्रगती करण्यासाठी प्रेरित केले. त्यांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्य सारंगधर बावस्कार यांनी खेळाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी क्रीडाचे योगदान समजावून दिले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप गुंजाळ आणि सेक्रेटरी मीनाताई गुंजाळ यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या क्रीडा महोत्सवाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सहकार्य, आणि क्रीडाप्रेम वृद्धिंगत केले, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत क्रीडा महोत्सवाचे आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, कल्याण (ठाणे) :** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन दि.१६ जानेवारी रोजी पलावा सिटी, कल्याण येथे करण्यात आले होते. क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व क्रीडा क्षेत्रातील टेबल टेनिसपटू शिवप्रिया यांच्या हस्ते मशाल पेटवून करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी उपस्थित सर्वांना केले. तसेच जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी नवीन खेळांचे आयोजन करण्यात आले असून १८ विविध मैदानी खेळ तसेच इनडोअर गेम (बैठे खेळ) यांचे नियोजन उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी उत्तम केले असल्याने कौतुक केले. तसेच मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी मैदानी खेळ गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

प्रकल्प संचालक धायादेवी शिसोदे यांनी क्रीडा स्पर्धा व कलाविष्कार अधिकारी व कर्मचारी यांच्या विविध गुणांना वाव देण्यासाठी महत्त्वाचे असून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात सहभागी होऊन खेळांचा आनंद घ्यावा, अशा शुभेच्छा दिल्या. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी आरोग्य सुदृढ राहण्यासाठी तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी असे कार्यक्रम आयोजित करून खेळाचा आनंद घेणे महत्त्वाचे आहे. आरोग्याची काळजी घेण्यासाठी तसेच रोजच्या कामाचा ताण विविध खेळ खेळून आनंद व्यक्त करण्यासाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन यावेळी केले.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे प्रास्ताविक करताना म्हणाले की क्रीडा महोत्सव आयोजित करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक व बँक ऑफ बडोदा यांच्या सौजन्याने शक्य झाले. सर्व विभाग प्रमुख यांनी मोलाचे योगदान दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. सर्वांनी सहभाग नोंदवण्यासाठी व खेळांचे आनंद घेण्यासाठी आवाहन केले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरुडकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग प्रमुख संदिप चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी माध्यमिक ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे, महिला व बाल विकास विभाग प्रमुख संजय बागुल, बांधकाम विभाग प्रमुख संदिप चव्हाण, जिल्हा कृषी अधिकारी एम.एम. बाचोटीकर, सर्व तालुकास्तरीय गट विकास अधिकारी व विभाग प्रमुख तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. क्रीडा महोत्सवात विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. कबड्डी, खोखो, बॉक्स क्रिकेट, लंगडी, रस्सी खेच हे खेळ सांघिक खेळ असून वैयक्तिक खेळांमध्ये महिला व पुरुषांसाठी १०० मिटर धावणे, गोळा फेक, बॅडमिंटन, टेबल टेनिस, स्कवॅश, कॅरम, बुध्दीबळ, संगीत खुर्ची, जलतरण अशा स्पर्धा घेण्यात आल्या.

क्रीडा स्पर्धेसाठी जिल्हा परिषदेच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा स्तर, तालुका स्तर, ग्रामपंचायत स्तरावरील सर्व कर्मचारी वर्ग व शिक्षक वर्ग सहभागी झाले आहेत.

## एमडी आणि कोडीयनयुक्त सिरप बाटली विक्री करणाऱ्या आरोपी जेरबंद

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.१७, ठाणे :** नशेखोर विरोधात पोलीस आयुक्त अशितोष डुंबरे यांनी कडक पावले उचलली असून त्यांनी अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमांचे विरुद्ध कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आली. त्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरता अमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा ठाणे शहर यांना १२/०१/२०२५ रोजी एका गुप्त बातमीदार मार्फत सापाळा रचून कारवाई केली.



देसाई नाका, खिडकाळी, कल्याण शील रोड,डायघर,ठाणे या ठिकाणी इसम जॉन जेम्स फ्रान्सिस उर्फ ओनाह चिडोझी, एथलबटे उर्फ जॉन फ्रान्सिस वय ४५ राहणार, मस्जिद बंदररोड, मुंबई (नायजेरियन देश) यांचे ताब्यात एकूण रुपये ६६,१८,०००/-किमतीचं एकूण ६६१.८ ग्रॅम वजनाचं एमडी Mephedron अमली पदार्थ विक्री करता बाळगला असताना जप्त करण्यात आला. सदर बाबत डायघर, पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६१/२०२५ एनडीपीएस कायदा कलम ८(क), २२(क) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. असून अटक आरोपीचे दिनांक १७/०१/२०२५ रोजी पोलीस कस्टडी रिमांड मंजूर करण्यात आली.अटक आरोपीचा पूर्व इतिहास अमली पदार्थ विरोधी पथक बांद्रा मुंबई येथे त्याच्यावर कारवाई करण्यात आली.

आरोपी हा सदर गुन्ह्यात सहा वर्ष शिक्षा भोगून १३/११/२०२४ रोजी कारागृहातुन बाहेर आलेला आहे. १) दिनांक ०९/०१/२०२५ रोजी गोवे नाका, कोनगाव, भिवंडी येथील इसमाचे नाव मोशाद अहमद शेख वय ४५ राहणारा भिवंडी २) मोहम्मद तौकीर फारुख अंसारी वय २४ राहणार भिवंडी आपसात संगमत करून आपल्या ताब्यात कोडीनयुक्त कप सिरप शंभर एम एल सिरप १७७ बाटल्या अशा एकूण ४६७ बॉटल्स ८७,७७७/-रुपये किमतीचा मुद्देमाल व बाटल्या विक्रीकरिता बेकायदेशीरपणे बाळगत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

## वाढवणा हद्दीत मटक्याची व अवैध दारूची मजबूती झाली

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१७, उदगीर (लातुर) :** नांदेड परिक्षेत्रासाठी पोलीस महानिरीक्षक म्हणून शहाजीराव उमाप रुजू झाल्यानंतर, अवैध धंद्यांना थारा मिळणार नाही. अशा पद्धतीच्या वल्गना मोठ्या प्रमाणात चालू होत्या. मात्र काही भ्रष्ट प्रवृत्तीच्या स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सोमया मुंडे यांच्या आदर्शवादी विचारांना मूठ माती देत, आपापल्या भागात राजरोसपणे अवैध धंदे चालू केले आहेत.

वाढवणा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये गुडसुर आणि इतरही ग्रामीण भागामध्ये अवैध दारूचे व मटका, गुटखा, जुगार हे राजरोसपणे चालू असल्याची ओरड सतत केली जात आहे. जास्त ओरड सुरू झाल्यानंतर किंवा वरिष्ठाकडून या अनुषंगाने चौकशी सुरू झाल्यानंतर थातूरमातूर कारवाई करून, लपून छपून चालू असलेल्या अवैध धंद्यावर आम्ही धाडी टाकल्या आहेत. अशा पद्धतीचे नाटक रचून अधिकारी आणि जनतेची दिशाभूल करण्यामध्ये काही अधिकारी पटाईत झाले आहेत. वास्तविक पाहता राजरसपणे सर्वसामान्य गोरगरिबांचे संसार उध्वस्त होत आहेत. झटपट श्रीमंत होण्याच्या नादात विद्यार्थी आणि सुशिक्षित बेकार मटका, जुगाराकडे आकर्षित होऊ लागले आहेत. मात्र चिरीमिरीच्या नादात पोलीस प्रशासनातील झारीतले शुक्राचार्य या गोष्टीकडे नजर अंदाज करत आहेत. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. अशी चर्चा आता सर्वत्र चालू आहे.

शाळेच्याजवळच अवैध दारू विक्रीवाढवणा (बु.)येथील जिल्हा परिषद प्रशाला,कन्या प्राथमिक शाळा,अंगणवाडी जवळच रस्त्यावर व घरातून अवैध देशी दारू विक्री करण्यात येत आहे.उदगीर तालुक्यातील वाढवणा (बु.) परिसर हा अवैध धंद्याचे माहेरघर म्हणून ओळखले जात आहे .मोठ्या प्रमाणात अवैध दारूची विक्री या भागात होत असते.मात्र




मागील काही महिन्यापासून अवैध दारू विक्रेतेकोणालाही दाद देत नाहीत.पुर्वी छुप्या पध्दतीने केली जाणारी ही दारू विक्री आता उघड पध्दतीने करण्यात येत आहे.जिल्हा परिषद शाळेजवळ, रस्त्यावर व घरांमधून अवैध दारूची विक्री केली जात आहे.प्रशासनाने याकडे लक्ष देऊन दारू विक्री बंद करावी,अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

विशेष म्हणजे या अवैध दारूच्या व मटक्याला चालना देणारे किंवा यांची मुळे मजबूत करणारे कोण आहेत? हे जग जाहीर आहे. असे असताना देखील मुळावर घाव न घालता केवळ फांद्या छाटून आम्ही फार कर्तबगार आहोत, अशा पद्धतीची बतावणी करण्यामध्ये ही काही जण पटाईत आहेत. मात्र त्या किरकोळ कारवाया अवैध धंदेवाल्यांना पूर्वकल्पना देऊन केली जात असल्याची ही ओरड जनतेतून होऊ लागली आहे.एका बाजूला अवैध दारूच्या नावाखाली अनेक गोरगरिबांचे संसार उध्वस्त करण्याचा डाव या अवैध धंदेवाल्यांनी रचला असला तरी, कायदा सुव्यवस्थेचा विचार करून पोलीस प्रशासनाने यावर अंकुश ठेवायला हवा.

मात्र पोलीस प्रशासनातील काही अधिकारी जणू काही त्या अवैध धंदेवाल्यांचे भागीदार आहेत की काय? अशा पद्धतीने वागत असल्याने इतरही अवैध धंदेवाल्यांना बळ मिळू लागले आहे. अशीही चर्चा सुरू झाली आहे.तर महाराष्ट्र शासनाने कोट्यावधीचा कर बुडाला तरी हरकत नाही, मात्र महाराष्ट्रातील तरुणांचे आरोग्य अबाधित राहावे. असा विचार करून गुटखा आणि सुगंधित तंबाखू वर बंदी घातली. मात्र शासनाचा आणि समाजाच्या हिताचा विचार न करता काही स्वार्थी प्रवृत्तीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अवैध धंद्याला बळ दिल्याची चर्चा आहे. आपल्या देशहिताच्या आणि समाज हिताच्या गोष्टीला बगल देऊन किरकोळ हप्त्याच्या नादात परराज्यातून महाराष्ट्रात येणाऱ्या गुटख्याला आणि सुगंधित तंबाखूला हिरवा कंदील दाखवला जातो, कित्येक वेळा तर या पोलीस प्रशासनातील काही लाचखोर प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांमुळेच गुटखा महाराष्ट्रात विशेषतः सीमा भागातून उदगीर, गुडसुर वाढवणा, जळकोट, अहमदपूर या भागात जात असल्याची ही आता खुलेआम चर्चा सुरू झाली आहे.

गंमत म्हणजे ही बाब स्थानिकच्या प्रभारी अधिकाऱ्यांना माहित असून देखील ते देखील आपल्या हाताखालच्या कर्मचाऱ्यांना आवर घालण्यामध्ये कुठे कमी पडतात? हे कळायला मार्ग नाही. आणि या अवैध दारूच्या गुटख्याच्या आणि मटक्याला हिरवा कंदील दाखवल्यामुळे अवैध दारूवाल्यांचेही आता अच्छे दिन येऊ लागले आहेत. कारण वाढून पोलीस स्टेशनची आता पॉलिसी ठरली आहे हप्ते द्या आणि अवैध दारू विक्री करा असे म्हटले तर नवल वाटू नये. वाढवणा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये तर अशा अवैध देशी दारू आणि हातभट्टीच्या दारू नी कहर केला आहे. अवैध धंदे तर चालूच आहेत, त्यात अवैध दारू विक्री चालूच आहे. हे लोकांना माहीत होते, मात्र ते यासंदर्भात जास्त ओरड करत नव्हते. मात्र आता दारू विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांची एवढी हिंमत वाढली आहे की, चक्क विद्यार्थ्यांना दिसेल अशा पद्धतीने शालेय परिसराच्या आजूबाजूला राजरोसपणे अवैध दारू विक्री केली जात आहे.

# थोडक्यात

## मुरढव येथे वाचन पंधरवाडा संपन्न...

**अक्षराज : उमेश जोशी**



**दि.१७, रेनापुर :** रेनापुर तालुक्यातील मुरडव येथील पद्मावती विद्यालय जि प प्रशाला व सार्वजनिक वाचनालय दि.१५ जानेवारी महाराष्ट्र राज्य सरकारने ज्याहीर केल्याप्रमाने व जिल्हा ग्रंथालय आधीकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेरणा सार्वजनिक वाचनालय, मुरढव ता.रेणापूर येथे वाचन पंधरवाडा दि.१ जानेवारी ते १५ जानेवारी पर्येत संपन्न झाला. बुधवार दि. १५-जानेवारी रोजी समारोप कार्येक्रम घेण्यात आला. या कार्येक्रमाचे आध्यक्ष धनवे डि.एम.होते. तसेच उपस्थित साबदे सर, शाहापुरे सर, सुर्येवंशी सर, मोरे मँडम, कांबळे सर, तसेच जी.प.चे कौलास करसर, मोरे मँडम उपस्थित होते. तसेच ग्रंथपालचव्हाण शास्त्री हे संयोजक होते. जी.प.व पदमावती विध्यालयातिल सर्व विध्यार्थी - विध्यार्थीनी शिक्षक उपस्थित होते. या प्रसंगी कार्येक्रमाचे प्रास्ताविक साबदे सर यांनी केले. यात पुस्तक वाचण्याचा मुळ हेतू पुस्तक वाचाल तरच वाचाल आसे समजावून सांगितले. या नंतर चव्हाण शास्त्री यांनी विध्यार्थांनी जुने व नविन पुस्तके ज्यास्थीत ज्यास्त वाचावे यामूळे ज्ञानामधे भर पडते व आपण स्वयंम प्रकाशित होतो. असा विच्यार माडला. कौलासकर सर यांनी शिक्षण हे वाघीनीचे दुध आहे जो पिईल तो आन्याया विरूध्द गुर- गुरल्या शिवाय राहाणार नाही असे मत मांडले. यानंतर कार्येक्रमाचे आध्यक्ष धनवे सर यांनी पुस्तकाचे महत्त्व पटवून सांगितले. वाचनाने मानसाचे मस्तक सुधारते म्हणून आपल्या चौकस बुद्धीचा विकास करायचा आसेल तर पुस्तकाचे वाचन केले पाहिजे. हा मौल्यीक संदेश त्यांनी दिला. आभार प्रदर्शन सुर्यवंशी सर यांनी केले. आध्यक्ष व उपस्थित प्रमुख पाहूणे तसेच विध्यार्थी - विध्यार्थिनी यांचे आभार मानून ऐम.पि.एसी.व युपीएससी चे पुस्तके पण प्रेरणा सार्वजनिक वाचनालयात मिळतील असे सांगून कार्येक्रम संपल्याचे जाहिर केले.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून जबाबदार नागरिक घडतात - भाई गोळेगावकर

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**



**दि.१६, पालम (परभणी) :** राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये कर्तव्य आणि राष्ट्रीय निष्ठा यांची वाढ होते. त्यातूनच जबाबदार नागरिक घडत असतात असे प्रतिपादन भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी केले. ते तालुक्यातील जवळा येथे माधवराव पाटील महाविद्यालय पालम च्या रोसयोचे वार्षिक विशेष शिबीर उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी उद्घाटक भाई तुषार गोळेगावकर, प्रमुख पाहुणे नायब तहसीलदार विनोद पवार, सरपंच महानंदा खटींग, प्राचार्य डॉ.एच.टी.सातपुते, उपप्राचार्य डॉ.ए.डी.आरसुळे व आनंद गिजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना भाई लक्ष्मणराव गोळेगावकर म्हणाले की, शिबीर ग्रामीण भागात होत असल्याने ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांचे प्रश्न विद्यार्थ्यांना कळतील . येणाऱ्या काळात ग्रामीण विकासासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे भाषण झाले. कार्यक्रमाची सुरुवात एन.एस.एस गीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ.गोवर्धन उरकुडे यांनी केले. तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ.मोहन डमरे यांनी मानले. यावेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांची ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

## किड्स लर्निंग स्कूल भेंडी ला सीबीएससी संलग्नता

**अक्षराज : दिपक शिवले**



**दि.१७, कळवण :** भेंडी ता.कळवण येथील किडस् लर्निंग स्कुलला एप्रिल २०२५ या शैक्षणिक वर्षा पासून केंद्रीय अभ्यासक्रम म्हणजेचसीबीएससीमान्यता मिळाली. यामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांना देशभरातील उत्कृष्ट शैक्षणिक प्रणालीचा लाभ मिळणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना सीबीएससी अभ्यासक्रमानुसार शिक्षण दिले जाईल. ज्यामुळे त्यांचा शैक्षणिक दर्जा अधिक मजबूत होईल. या संलग्नतेमुळे शाळेतील शिक्षण पद्धतीला एक सुसंगत दिशा मिळणार आहे. विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक उपक्रम, कार्यशाळा आणि वर्तमनातील आवश्यक कौशल्य शिकवले जातील. शाळेचे व्यवस्थापन, शिक्षक वर्ग आणि विद्यार्थ्यांचे पालक यांच्यातील सहकार्याने ही संलग्नता शाळेच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. शाळेच्या समन्वयक सुचिता प्रमोद रौंदळ म्हणाल्या, आम्ही सीबीएससी संलग्नतेचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांना एक सशक्त आणि भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार करणारा शिक्षण देण्यास कटिबद्ध आहोत.

## शिक्षक भारती संघटनेचे २२ जानेवारीला असंतोष आंदोलन

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**



**दि.१७, पुणे :** पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नासंदर्भात व उपसंचालक कार्यालयातील भ्रष्ट व मग्रूर लिपिक यांच्या विरोधात शिक्षण आयुक्त यांच्या दलनासमोर असंतोष आंदोलन पुणे विभागीय शिक्षक भारती संघटना करणार आहे. अहिल्यानगर, सोलापूर, पुणे जिल्ह्याचे सर्व शिक्षक भारती पदाधिकारी, सदस्य, प्रलंबित प्रश्न असलेले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे. यावेळी अन्यायग्रस्त कर्मचारी यांनी ही उपस्थित राहण्याचे आव्हान कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक भारती संघटना अहिल्यानगर च्या महिला जिल्हाध्यक्ष रूपाली कुरूमकर यांनी केले. शिक्षण आयुक्त कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी रजनी रानडे यांना आंदोलनाचे निवेदन यावेळी देण्यात आले.